# एम.बी.ए. पदवीधर विद्यार्थ्यांना नेतृत्व करण्याची संधी - श्री. कृष्णाजी पाटील

एम.बी.ए. पदवी घेऊन विद्यार्थ्यांना कंपनीत व उद्योग संस्थेमध्ये मध्ये नेतृत्व करण्याची संधी उपलब्ध करून होते. व्यवसायाची विपणन, वित्त व कर्मचारी या प्रमुख तीन विभागाचे नेतृत्व करण्यासाठी आवश्यक असणारे ज्ञान व कौशल्य या पदवी अभ्यासक्रमातून विद्यार्थ्यांना अर्जित करता येते आणि नोकरी करण्याची इच्छा नसल्यास उद्योग व्यवसाय देखील उभा करता येऊ शकतो असे विधान राजारामबापू इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट अँड टेक्नॉलॉजी येथील श्री. कृष्णाजी पाटील यांनी केले. श्री व्यंकटेश महाविद्यालय इचलकरंजी येथे आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. 'मॅनेजमेंट एज्युकेशन फॉर ग्लोबल फ्युचर: अनलॉकिंग अपॉर्च्युनिटीज अँड इंटरनॅशनल एक्सपोजर' या विषयावर व्याख्यानामध्ये ते बोलत होते. एमबीए परीक्षेसाठी कशी तयारी करावी, परीक्षेचे स्वरूप, अभ्यासक्रम आणि स्टडी मटेरियल, परदेशी इन्स्टिट्यूट मधील शिक्षण, इंटरशिपची सोय इत्यादी बाबतीत त्यांनी विद्यार्थ्यांना सविस्तर मार्गदर्शनपर व्याख्यान दिले. विद्यार्थ्यांमध्ये असणारे उपजत गुण एम.बी.ए. कोर्समुळे विकसित होऊन प्रगल्भ व्यक्तिमत्त्व तयार करण्यामध्ये मदत होते. अनेक लोकांना एकत्र घेऊन काम करणे, व्यक्तीसमूहाच्या कार्याला दिशा देणे, त्यांचे ध्येय साध्य करण्यासाठी मदत करणे, त्यांचे प्रश्न व समस्यांची समाधानकारक सोडवणूक करणे तसेच निर्देशन व संचलन करणे या प्रकारच्या नेतृत्व गुणांचा विकास त्यांच्यामध्ये होण्यास मदत होते त्यामुळे नेतृत्व करू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी एमबीए कोर्सची तयारी करून प्राविण्य मिळवावे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजय माने उपस्थित होते. एमबीए अभ्यासक्रमाचे फॉरेन इंडस्ट्री मध्ये असणारे महत्त्व हे अनन्यसाधारण आहे विविध जॉब अपॉर्च्युनिटी या क्षेत्रामध्ये उपलब्ध असून विद्यार्थ्यांनी करिअर साठीचा उत्तम मार्ग निश्चित करून यश संपादन करावे असे उपदेशात्मक विधान त्यांनी आपल्या अध्यक्षीय मनोगतमध्ये व्यक्त केले. कार्यक्रमाच्या सुरुवातीस अकाउंटन्सी असोसिएशनच्या प्रमुख डॉ. एस. एच. आंबवडे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक व प्रमुख पाहुण्यांची ओळख करून दिली तर प्राध्यापक डॉ. एस. आर. ठाकर यांनी आभार प्रदर्शन केले.


AND
RAJARAMBAPU INSTITUTE OF
MANAGEMENT AND
TECHNOLOGY,ISLAMPUR
PREPARATION OF MBA EXAM
Shri Venkatesh Mahavidyalaya,
सारंग दास,इचल.